INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री मुक्तीचा लढा

## (Dr. Babasaheb Ambedkar and the fight for Women's Liberation)

**शशिकांत सर्जेराव माघाडे**

सहाय्यक प्राध्यापक,
राज्यशास्त्र विभाग ,
शंकर नारायण कला व वाणिज्य महाविद्यालय ,
भाईंदर जिल्हा -ठाणे , महाराष्ट्र
E-mail: shashimaghade@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/05.2022-35578289/IRJHIS2205015

**प्रस्तावना :**

आधुनिक राजकीय सिद्धांतामध्ये स्त्रीवाद किंवा स्त्रीमुक्तीवाद या विचारप्रवाहाचा अलीकडच्या काळात खूप गांभीर्याने विचार केल्याचे दिसून येते. स्त्रियांना समान राजकीय, सामाजिक आर्थिक आणि सांस्कृतिक अधिकार मिळाले पाहिजेत असा विचारप्रवाह जगभरातल्या चळवळीतून आणि विचारवंतांकडून मांडला गेला आहे. विविध देशांमध्ये स्त्रीमुक्तीच्या चळवळीने राज्यकर्त्यांना स्त्रियांविषयी विविध धोरणे स्वीकारण्यास भाग पाडले. भारतामध्ये देखील अशा प्रकारची स्त्रियांच्या कल्याणाची धोरणे असली पाहिजेत असा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केल्याचे दिसून येते. केवळ आग्रहच नाहीतर हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून समस्त स्त्री वर्गाला न्याय देण्याचा बाबासाहेबांनी संसदेत प्रयत्न केला.

सरकारी म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रामध्ये पुरुषांबरोबरच स्त्रियांना देखील समान वाटा आणि अधिकार असला पाहिजे अशी मांडणी स्त्रीवादी विचारवंत करतात. पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये चूल आणि मूल ही स्त्रियांची जबाबदारी असून सरकारी नोकऱ्या, शिक्षण ,व्यवसाय यामध्ये पुरुषांची मक्तेदारी असली पाहिजे अशी विषमतापूर्वक स्त्री- पुरुष विभागणी केल्याचे दिसून येते. हा भेदभाव स्त्रीवादाला मान्य नाही आणि ते रास्तच आहे.

देवाचा दाखल देऊन 'स्त्रिया या मुळातच बुद्धीहीन असतात ' अशा प्रकारच्या नकारात्मक धार्मिक वैचारिक मांडणीला स्त्रियांनी विरोध केल्याची शक्यता काही स्त्री विचारवंतांनी मांडल्याचे दिसून येते. विशेषतः १५ व्या शतकात अशा प्रकारच्या धर्माच्या आज्ञा आणि नियम बनवणाऱ्या धर्मगुरूंना स्त्रियांनी

विरोध केल्याचे दिसून येते. १७ व्या शतकात इंग्लंडमध्ये आणि १८ व्या शतकात युरोप मध्ये स्त्रीवादी विचार आणि चळवळ सामान्य लोकांपर्यंत पोहोचल्याचे बघायला मिळते. १७९२ मध्ये मेरी उलस्टोन क्रॉफ्ट या स्त्री विचारवंताने 'vindication of the rights of women ' हा ग्रंथ लिहून स्त्रियांच्या राजकीय अधिकारांचा पुरस्कार केला. जॉन स्टुअर्ट मिलने स्त्रिया आणि पुरुष हे दोन्ही समान क्षमतेचे असून स्त्री - पुरुष समानतेचा पुरस्कार करत उपयुक्ततावादी दृष्टीकोन मांडला. आधुनिक स्त्रीवादी विचारांमध्ये आदर्शवादी दृष्टीकोनाचा विचार केल्यास कुटुंबसंस्था, धर्मसंस्था आणि खाजगी संपत्ती यांना नाकारणारा विचार पुढे येतो.स्त्रियांचे शोषण सर्वप्रथम थांबले पाहिजे तरच स्त्री मुक्ती शक्य आहे असा समाजवादी विचारप्रवाह मानतो. १९६०-१९८० या कालखंडात जहालवादी स्त्रीवादाची मांडणी करण्यात आली. स्त्रियांच्या दुर्दशेस पुरुष वर्ग जबाबदार असून या वाईट परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी विवाह आणि मातृत्व नाकारले पाहिजे अशी मांडणी जहालवादी स्त्रीवाद्यांनी केली.

भारतामध्ये महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले तसेच समकालीन समाजसुधारकांनी स्त्री मुक्तीच्या चळवळीत मोठे योगदान दिले. बंगाल मध्ये राजाराममोहन रॉय यांचे योगदान सर्वश्रुत आहे. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर खऱ्या अर्थाने महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्त्रिया मोठ्या प्रमाणात सामील झाल्या. त्या आधी म्हणजे १९२० पूर्वी केवळ अभिजन वर्गाचा या आंदोलनावर प्रभाव होता. डॉ. अँनी बेझंट यांच्या पुढाकाराने 'ऑल इंडिया विमेन्स कॉन्फरन्स' ही संघटना निर्माण स्थापन झाली. अन्यायमूलक हिंदू कायदे रद्द करून सुधारित हिंदू कोड निर्माण झाला पाहिजे अशी आग्रही मांडणी करण्यात येऊ लागली. १९३५ च्या मोन्टेग्यू चेम्सफर्ड कमिशनसमोर स्त्रियांच्या राजकीय हक्कांची मांडणी करण्यात आली पण त्यात यश आले नाही. भारतातल्या सामाजिक परंपरेतआणि पुरातन चालीरितींमध्ये हस्तक्षेप करायचा नाही असे ब्रिटिशांचे धोरण असल्याने स्त्रियांना सामान्य वर्गातील स्त्रियांना ब्रिटिशांनी अधिकार दिले नाहीत. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर आपण १९५० साली लोकशाही व्यवस्था स्वीकारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेचा मसूदा सादर करताना राजकीय समानतेसोबत सामाजिक आणि आर्थिक समानता प्रस्थपित झाली पाहिजे अन्यथा राजकीय समानतेलाअर्थ उरणार नाही असे स्पष्टपणे बजावले.

जातिव्यवस्था आणि स्त्रियांचे शोषण यांचा परस्परांशी अतिशय जवळचा संबंध आहे असे स्पष्ट प्रतिपादन डॉ. आंबेडकरांनी केले आहे.जातीव्यवस्थेचे प्रमुख लक्षण म्हणजे 'जातीअंतर्गत विवाह' असून जातीबाहेर विवाह होऊ नयेत अशी व्यवस्था निर्माण केली गेली असून यातच जातीव्यवस्थेच्या उदयाची कारणे सापडतात. ही व्यवस्था कायमस्वरूपी टिकावी म्हणून चार प्रमुख रूढी निर्माण केल्याचे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात त्या म्हणजे अ) सतीप्रथा ब) विधवापन क) सक्तीचे ब्रम्हचर्य ड) जरठ-बाला

विवाह, विधवा स्त्री जिवंत राहिल्यास अनेक धोके निर्माण होऊ शकतात जसे की विधवा स्त्री दुसऱ्या जातीतील पुरुषाशी विवाह करू शकते. अशा वाढीव स्त्रीमुळे सामाजिक संतुलन बिघडेल आणि इतर उपवर मुलींच्या विवाह हक्कावर आक्रमण होईल म्हणून पतीसोबतच तिलाही सती जाण्यास भाग पाडणे हा जातीव्यवस्था टिकवून ठेवण्याचा मार्ग होय असे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. मात्र केवळ सतीप्रथाच पुरेशी नसून जातीव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी सक्तीचे विधवापन हाही मार्ग अवलंबला गेल्याचे दिसते. स्त्रीला विद्रुप करून अत्यंत खालच्या दर्जाचे राहणीमानाची बंधने तिच्यावर टाकण्यात आली. विधवेप्रमाणेच विधुर पुरुषांना ब्रम्हचर्याचे पालन करण्याचे बंधन टाकण्यात आले. मात्र अशा पुरुषांना जातीत बंदिस्त करायचे असेल अल्पवयीन मुलींशी विवाह करण्याचे मार्ग अवलंबले गेले. अशा प्रकारचे उपाय सर्वथा अन्यायकारक आहेत असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले आहे. स्त्रियांवर विविध प्रकारची अन्यायकारक बंधने लादून जातीव्यवस्था कशी बळकट होईल आणि बंदिस्त होईल अशी व्यवस्था करण्यात आली. म्हणजेच खऱ्या अर्थाने स्त्रिया याच जातिव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहेत असे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात.

हिंदू धर्मामध्ये समता, बंधुभाव, स्वातंत्र्य आणि न्याय अस्तित्वात नाही असे बाबासाहेबांचे स्पष्ट मत होते. हिंदू धर्मात मिश्र विवाह करता येत नाहीत. विवाह, घटस्फोट, पुनर्विवाह, वारसाहक्क इत्यादी बाबद स्त्रियांना परावलंबी बनवले गेले आहे.विशेष म्हणजे जातीय अत्याचाराचे प्रमाण खालच्या जातीच्या म्हणजेच दलित आणि आदिवासी स्त्रियांमध्ये अधिक दिसून येते. मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण दलित आदिवासी स्त्रियांमध्ये अधिक प्रमाणात दिसून येते. दलित आदिवासी स्त्रियांवरील बलात्काराचे प्रमाण पण लक्षणीय आहे.

डॉ. आंबेडकरांच्या मते, स्त्रियांच्या वर्तमान विदारक स्थितीस 'मनुस्मृती' जबाबदार आहे. मनूने स्त्रियांच्या घटस्फोट आणि मालमत्तेतील हक्कांना विरोध केला.कुटुंबाच्या कोणत्याही मालमत्तेवर स्त्रीचा अधिकार नाही असे मनू स्पष्ट करतो. मनू हा ब्राम्हणी संस्कृतीचा पुरस्कर्ता आहे जिथे स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य आणि समानता नाकारली जाते. मात्र दुसरीकडे बुध्द स्त्रियांचे स्वातंत्र्य मान्य करतो. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार बुद्ध मान्य करतो .बुद्ध स्त्री - पुरुष भेद मानत नाही. खऱ्या अर्थाने बुद्ध स्त्री मुक्तीचा पुरस्कर्ता आहे. आंबेडकर म्हणूनच बुद्धाच्या विचारांचे समर्थन करतात. पुढे जाऊन आंबेडकर बुद्ध धर्माचा स्वीकार करून बौद्धमय भारत निर्माण करण्याचे स्वप्न बघतात ही उल्लेखनीय बाब आहे . म्हणजेच बुद्ध हा केवळ व्यक्ती नसून आधुनिक विचार आहे जो स्त्री मुक्तीचा पुरस्कार करतो असेच आंबेडकर सुचवू इच्छितात. आंबेडकरांच्या मते मनूने स्त्रियांच्या गुलामीचा पाया घातला आहे. स्त्रियांवर अनेक बंधने घालणारे कायदे मनूने तयार केले. या सर्व अन्यायकारक कायद्यांच्या कचाट्यातून मुक्त होण्यासाठी बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाची कल्पना मांडली आणि तिला कायदेशीर मूर्त स्वरूप देण्याचा प्रयत्न केला.

दुर्दैवाने बाबासाहेबांच्या हयातीत हे बिल मंजूर होऊ शकले नाही. या बिलामध्ये वारसा, विवाह आणि घटस्फोट यासंबंधी बाबासाहेब सुधारणा घडवून आणू इच्छित होते. हिंदू कायद्याप्रमाणे पुरुष एकापेक्षा अधिक विवाह करू शकतो म्हणून बाबासाहेबांना यात सुधारणा घडवायची होती. घटस्फोट धार्मिक पद्धतीने न होता कायद्याप्रमाणे व्हायला हवा असे बाबासाहेबांचे मत होते. वारसाहक्कांच्या कायद्यात बाबासाहेब स्त्रियांना समान वाटा देऊ इच्छित होते कारण वडिलांच्या संपत्तीत मुलीला कोणताही वाटा असणार नाही असा कायदा अस्तित्वात होता. या कायद्याद्वारे बाबासाहेब स्त्रियांना समता आणि स्वातंत्र्य बहाल करणारे कायदे आणू इच्छित होते. हिंदू कोड बिल पास व्हावे यासाठी बाबासाहेब मंत्रिमंडळात सामील झाले होते मात्र सरकारच्या उदासीन धोरणामुळे बाबासाहेबांना कायदे मंत्री पदाचा राजीनामा द्यावा लागला. हिंदू धर्मात पवित्र समजल्या जाणाऱ्या नियम, कायदे, रूढी परंपरांमध्ये आमूलाग्र बदल आणि समान कायदे निर्माण करून खऱ्या अर्थाने भारतीय समाजाला प्रगतीच्या मार्गावर नेण्याचे स्वप्न बाबासाहेबांनी पाहिले होते. हिंदू कोड बिल प्रामुख्याने दोन उद्देशांवर आधारित होते ते दोन उद्देश म्हणजे एक हिंदू धर्मातील अनेक ग्रंथात, पुराणे, स्मृती, वेद इत्यादी वेगवेगळया ठिकाणी पसरलेल्या नियम, कायदे, रूढी परंपरांना एकत्र करून त्यात सुधारणा घडवून आणणे. दुसरा उद्देश म्हणजे हिंदू धर्मातील प्रचलित नीती नियमांना भारतीय राज्यघटनेला अनुरूप बनवणे. दुसऱ्या उद्देशा बद्दल बाबासाहेब म्हणतात, जे लोक हिंदू कोड बिलास विरोध करत आहेत त्या लोकांचे लक्ष मी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १५ कडे वेधू इच्छितो ज्यामध्ये नागरिकांना मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. या कलमान्वये राज्य कोणत्याही नागरिकाच्या विरोधात धर्म, वंश, जात, भाषा, प्रांत, लिंग यावर आधारित भेदभाव करणार नाही. मात्र सध्याचे जे हिंदू धर्मातील नीती नियम आहेत ते स्त्री-पुरुष भेदावर आधारलेले आहेत. यात सुधारणा करणे गरजेचे आहे.

भारतीय राज्यघटनेचा मसुदा जरी बाबासाहेबांनी तयार केला असला तरी सामाजिक समता प्रस्थापित होण्यासाठी हिंदू कायद्यात सुधारणा केल्याशिवाय राज्यघटनेला अर्थ आणि पूर्णत्व येणार नाही असे बाबासाहेबांचे मत होते. १९४३ साली बी.एन. राव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून काही समाजसुधारणेचे कायदे पास करण्यात आले मात्र स्त्री पुरुषांच्या हक्कासंबंधी जी काही विषमता किंवा असमानता जातीव्यवस्थे मध्ये होती त्यामध्ये सुधारणा करण्याची कुणाची तयारी नव्हती. हे मोठे आव्हान स्वीकारून बाबासाहेबांनी नेहरूंच्या पाठिंब्याने हे बिल पार्लमेंट मध्ये मांडण्याचे धाडस केले. जेव्हा ११ एप्रिल १९४७ रोजी सदर बिल संसदेत सादर करण्यात आले तेव्हा संसदेत आणि संसदे बाहेर या बिलाविरोधात पडसाद उमटू लागले.बाबासाहेब हिंदू धर्म नष्ट करायला निघाले आहेत अशा प्रकारची चर्चा होऊ लागली. तसेच बाबासाहेब अस्पृश्य आहेत आणि निवडणुकीत कॉंग्रेस ला फटका बसू शकतो,

प्रस्थापितांच्या हिताला बाधा येईल अशा कारणांमुळे हे बिल पास होऊ शकले नाही. मात्र देशभर या बिलास विरोध होत असताना अनेक मान्यवरांनी या बिलास पाठिंबा दर्शविला. न. वि. गाडगीळ, अल्लादि कृष्णस्वामी, दुर्गाबाई देशमुख इत्यादी मान्यवरांनी या बिलास समर्थन दिले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी या बिलाच्या समर्थनार्थ असे म्हटले की, देशाची प्रगती केवळ आर्थिक किंवा राजकीय अंगाने न करता ती सामाजिक दृष्टीकोनातून झाली तरच देशाची प्रगती शक्य आहे. आपल्या देशाचे कायदे नीतिनियम आणि रूढी-परंपरा स्त्री विरोधी असून स्त्रियांच्या अवनतीस हे कायदे जबाबदार आहेत. बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलाद्वारे राज्यघटनेच्या कलम ४४ जे मार्गदर्शक तत्वात अंतर्भूत केले आहे त्यास कलमास कायदेशीर रूप देण्याचा प्रयत्न केला. या मार्गदर्शक तत्वात (कलम ४४) असे स्पष्ट केले आहे की, 'सर्वांना समान अधिकार मिळण्यासाठी समान नागरी कायदा लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल'

बाबासाहेबांनी हिंदू कोड बिलात काही महत्वपूर्ण तरतुदी केल्या त्या पुढीलप्रमाणे-

१) मृत पावलेल्या पुरुषाची विधवा पत्नी, त्याची कन्या आणि पूर्वी मृत झालेल्या त्या पुरुषाच्या मुलाची विधवा पत्नी यांना समान वारसाहक्क देण्यात येईल.

२) धार्मिक संस्कारयुक्त विवाह,व विवाह नोंदणी, घटस्फोट, दत्तक विधान, या संबंधात स्त्रियांना केंद्रस्थानी मानून बाबासाहेबांनी विविध तरतुदी केल्या.

३) विवाहसमयी मुलीने हुंडा म्हणून आणलेले स्त्रीधन किंवा संपत्ती ही न्यास-मालमत्ता मानली जाईल आणि १८ वर्षानंतर ती स्त्री त्या मालमत्तेवरील हक्कास पात्र होईल. ती संपत्ती तिचा पती किंवा त्याच्या नातेवाईकांना वापरता येणार नाही अशी तरतूद बाबासाहेबांनी केली.

४) स्त्रियांच्या मर्यादित इस्टेटीचे कायमस्वरूपी इस्टेटीत रूपांतर करण्याची तरतूद बाबासाहेबांनी केली.

५) विवाह व दत्तक विधानातून जातीचे उच्चाटन करण्याची तरतूद बाबासाहेबांनी केली.

६) एक पत्नीत्वाचा कायदा आणि घटस्फोटाची तरतूद करून बाबासाहेबांनी स्त्रियांभोवती एक सुरक्षित कवच निर्माण केले.

हिंदू कोड बिल तयार करण्यासाठी बाबासाहेबांनी अपार कष्ट घेतले. १९४७ पासून ४ वर्षे म्हणजे १९५१ पर्यंत बाबासाहेब या बिलाची तयारी करत होते. दुर्दैवाने हे बिल नामंजूर झाले. मात्र १९५२ नंतर भारत सरकारने हेच बिल वेगवेगळे कायदे करून अंमलात आणले.

१) दि हिंदू मॅरेज ॲक्ट १९५५

२) दि हिंदू सक्सेशन ॲक्ट १९५६

३) दि हिंदू मायनोरिटी अँड गार्डीयनशिप ॲक्ट१९५६

४) दि हिंदू ॲडोप्शन अँड मेंटेनन्स ॲक्ट १९५६

वरील काही प्रमुख कायदे करून सरकारने हिंदू कोड बिलास काही अंशी न्याय दिला असे म्हणावे लागेल.

**संदर्भ ग्रंथ :**

१) डॉ. आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती, प्रतिमा परदेशी,सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे,१९९६

२) डॉ. आंबेडकर आणि हिंदू कोड बिल, चांगदेव भगवानराव खैरमोडे, सुगावा प्रकाशन, पुणे, सातवी आवृत्ती, मे २०१७

३) स्त्री स्वातंत्र्य आणि बुद्ध-फुले आंबेडकर, डॉ. दीपा रवींद्र श्रवस्ती नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, डिसें.२०११

४) Political Thought (पोलिटिकल थॉट ), डॉ. छाया बकाने, डॉ.स्वाती पितळे, शेठ पब्लिकेशन्स, मुंबई, सप्टें. २०१४

५) महिलांचे कैवारी, डॉ. रूपा कुलकर्णी-बोधी, लोकराज्य, एप्रिल २०१५, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन